जा.क्र.प्रा./प्राशि/आप्राशाला-मंजूरी/पुणे/१७३/२००३

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 27 JAN 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
१. प्रशासन अधिकारी,
मनपा/नपा., प्राथमिक शिक्षण मंडळ, तळेगाव दाभाडे.

विषय : सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत, मार्गदर्शन.

संदर्भ : शासनाचे शिक्षण विभागाकडील आदेश पत्र क्रमांक टीएसएस-( )/प्राशि-१, दिनांक

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या मान्यतेस प्राथमिक शाळेस त्यांचे नाव शासन दर्शविलेल्या माध्यमातून सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	शाळेचे शिक्षण	माध्यम
१.	श्री. भोलेनाथ महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे.	[illegible]	[illegible]

त्यामुळे या शाळेकडून खालील अटींची पूर्तता होणे किंवा कसे याबाबत आपण जागेवर भेट देऊन विहित मुदतीमध्ये अहवाल आपल्या आवश्यक अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधीत संस्थेला परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येईल.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेस कोणत्याही प्रकारचे वेतनेतर अनुदान अथवा अनुदानाच्या शक्यता असलेल्या शाळेत आणि अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा आसपासचे शाळेस मान्यता देण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित मुदतीमध्ये सुधारित शुल्कवाढ अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे शिक्षण बाबत सकारात्मक नाही.
७. शासनाची मंजूरी मिळालेनंतर प्राथमिक शाळा चालू केल्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- एवढे संस्थेने कोषागारात भरणा आहे.
८. संस्था नोंदणीबाबत शासनाच्या विहित नियमांप्रमाणे पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित नियमांप्रमाणे शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. प्रारंभ अधिकार-पत्रांची संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग स्वतंत्र विद्यार्थी संख्येची प्रवेश क्षमतेनुसार मान्यता प्रदान करावी.
११. प्रारंभ अधिकार-पत्रांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जास्त तुकड्या संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/-च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे
१३. संस्थेस ज्या वर्गी शाळेस परवानगी मागतात आहे. त्यावर्गी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पूर्वीच्या शाळा मुदतीने करण्यासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षाचा अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शाळेने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. इतरच एक वर्षानंतर मुदतीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित पेपरवर संस्था चालवण्याची किंवा अनुदान प्राप्तीवर माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व त्याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित तहसिलदार कार्यालयाकडे जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची यादी सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

Bolasnath Maharaj Shikshan Prasarak Mandal
Chairman

जा. क्र. 211 दिनांक 5/1/03
नगरपालिका शिक्षण मंडळ, तळेगाव दाभाडे
जि. पुणे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१